# 'मेट्रो ३'च्या आरे ते बीकेसी टप्प्याच्या चाचण्या पूर्ण

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** कुलाबा-वांद्रे-सिप्झ 'मेट्रो ३' मार्गिकेतील आरे ते बीकेसी हा पहिला टप्पा वाहतूक सेवेत दाखल करण्याच्या दृष्टीने महत्त्वाच्या 'रिसर्च डिझाइन अँड स्टँडर्ड ऑर्गनायझेशन'च्या (आरडीएसओ) चाचण्या पूर्ण झाल्या. तेव्हा आता भुयारी मेट्रो सेवेत दाखल करण्यासाठीच्या अंतिम चाचणीला अर्थात मेट्रो आयुक्त, मेट्रो रेल्वे सुरक्षा (सीएमआरएस) यांच्या चाचणीला लवकरच सुरुवात होईल. 'सीएमआरएस'च्या चाचण्यांच्या अनुषंगाने सध्या मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनकडून (एमएमआरसी) अंतर्गत चाचण्या सुरू आहेत.

'एमएमआरसी' ३३.५ किमी लांबीच्या भुयारी 'मेट्रो ३' चे काम करीत आहे. तर ही मार्गिका आता तीन टप्प्यांत वाहतूक सेवेत दाखल करण्याचा निर्णय 'एमएमआरसी'ने घेतला आहे.



आरे ते बीकेसी, बीकेसी ते वरळी आणि वरळी ते कुलाबा अशा तीन टप्प्यांत ही मार्गिका सेवेत आणली जाईल. दरम्यान पहिल्या टप्प्यातील अर्थात 'आरे ते बीकेसी'दरम्यानचे बांधकाम पूर्ण झाले आहे. हा टप्पा शक्य तितक्या लवकर वाहतूक सेवेत दाखल करण्याचा 'एमएमआरसी'चा प्रयत्न आहे. त्यामुळेच आता 'एमएमआरसी'ने हा टप्पा वाहतूक सेवेत दाखल करण्याच्यादृष्टीने अंतिम चाचण्यांना वेग दिला आहे.

जूनच्या पहिल्या आठवड्यात 'आरडीएसओ'चे पथक मुंबईत दाखल झाले आणि त्यांनी पहिल्या टप्प्यातील मार्गिकेदरम्यान चाचण्या सुरू झाल्या. आता या चाचण्या पूर्ण झाल्या आहेत.

'आरडीएसओ'च्या चाचण्या पूर्ण झाल्याने आता अंतिम चाचणीला अर्थात 'सीएमएसआर' चाचणी घेण्याच्याअनुषंगाने तयारी सुरू आहे. सध्या 'सीएमएसआर'च्या चाचण्यांच्यादृष्टीने 'एमएमआरसी'कडून अंतर्गत चाचण्या सुरू आहेत.